अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. २९ मे २०२५ | वर्ष १० वे | अंक ४२ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

# पाऊस वैरी बनून कोसळतोय, अन् शेतकरी मात्र रडतोय!

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

ब्रम्हपुरी तालुक्यात दररोज अवकाळी पाऊस पडत आहे. अचानक आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. खरीप व रब्बी हंगामात पुरेशे उत्पन्न हाती न आल्यामुळे, उन्हाळी हंगामातून उत्पन्न मिळेल या आशेत असणाऱ्या बळीराजाच्या आशेवर अवकाळी पावसाने पाणी फेरले आहे. धान पिक काढणीच्या मार्गावर असतांना अवकाळी पावसाने आठवडाभरापासून हजेरी लावल्यामुळे धान पिक मातीमोल झाला आहे. त्यामुळे मेटाकुटीला आलेल्या शेतकऱ्यांच्या मुखातून



'पाऊस वैरी बनून कोसळतोय' असे भावोद्गार ऐकावयास मिळत आहेत.

ब्रम्हपुरी तालुक्यात दरवर्षी मे महिन्यात पारा कायम ४५ अंश सेल्सीअस असताना, अचानक आलेल्या अवकाळी पावसाने मात्र वातावरणात गारवा निर्माण केला आहे. परंतु हा गारवा शेतकऱ्यांना आयुष्यातून कायमचा गार करणारा गारवा ठरत आहे. ब्रम्हपुरी तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून वादळी वारा व अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे.

त्यामुळे तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांनी लावलेल्या उन्हाळी धान पिकांचे अतोनात नुकसान होत आहे. ऐन धान पिक कापणी व चुरण्याच्या स्थितीत असतांना, दररोज वेळी अवेळी अवकाळी पाऊस कोसळत आहे. त्यामुळे शेतातील धान पिक धरातीर्थ कोसळला असून, सततच्या पाण्यामुळे धानाला कोंब फुटले आहेत. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेमुळे हिरावला गेला आहे. तालुक्यात वादळी वाऱ्यासह अचानक आलेल्या अवकाळी पाऊसामुळे शेत शिवारात असणारे धान पीक मातीमोल होऊन उद्धवस्त झाले आहे. खरीप व रब्बी हंगामात पुरेशे उत्पन्न हाती न आल्यामुळे, उन्हाळी हंगामातून तरी चांगले उत्पन्न मिळेल व आपले कर्ज फिटेल या आशेत असणाऱ्या बळीराजाच्या आशेवर अवकाळी पावसाने पाणी फेरले आहे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे खरीप हंगामाची पेरणी खर्च, मुलांचे शिक्षण, कर्जांचे हप्ते, उदरनिर्वाह, खतांची भाववाढ असे एक नव्हे अनेक प्रश्न शेतकऱ्यासमोर आ वासून उभे आहेत. एकीकडे शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला कवडीमोल भाव मिळते तर दुसरीकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे अस्मानी संकट

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# अवैध रेती तस्करी प्रकरणात जप्त केलेले ट्रॅक्टर पळविले

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात अवैध रेती तस्करीला उत आले आहे. अवैध रेती तस्करीमुळे शासनाचा लाखो रूपयांचा महसूल पाण्यात बुडत आहे. अवैध रेती तस्करीवर आळा घालण्यासाठी ब्रम्हपुरी तहसिल प्रशासनाने पाऊले उचलली असून रेती तस्करी करणाऱ्या ट्रॅक्टर मालकांवर कारवाई करण्यात येत आहे. अशातच अवैध रेती तस्करी प्रकरणी जप्त केलेले ट्रक्टर मालकाने पळवून नेल्याची घटना मंगळवारला सकाळी उघडकीस आली. पळवून नेलेल्या ट्रॅक्टर पैकी एक ट्रक्टर मालक महसूल विभागाला शरण जात, पळवून नेलेला ट्रक्टर तहसिल कार्यालयाच्या आवारात परत आणून ठेवला.

ब्रम्हपुरी महसूल विभागाचे अवैध गौण खनिज पथक दि.२६ मे च्या रात्री गस्तीवर असताना नायब तहसीलदार आशिष तालेवार यांच्या पथकाला आयशर कंपनीचे एमएच ३४ डी ९६५५ या क्रमांकाचे ट्रॅक्टर कुर्झा येथील नाल्यावर अवैध रेती तस्करी करताना आढळून आले. त्यावेळी नायब तहसिलदार आशिष तालेवार यांनी सदर ट्रॅक्टर चालकाकडे रेतीची वाहतूक करण्याचा परवाना विचारला असता, ट्रॅक्टर चालकाकडे रेती वाहतूक करण्याचा परवाना आढळून आला नाही. त्यामुळे नायब तहसीलदार आशिष तालेवार यांनी पंचनामा करून सदर ट्रॅक्टर तहसील कार्यालयात लावले व ट्रॅक्टरची चावी आपल्याकडे ठेवून घेतली.

ट्रॅक्टर मालक पुष्पक पंचभाई याने रेती तस्करीतील राजकीय वरदहस्त्याचे नाव घेत नाव घेत, महसूल कर्मचाऱ्यांना ट्रॅक्टर सोडण्याची विनंती केली. मात्र नायब तहसीलदार आशिष तालेवार यांनी अवैध रेती तस्करी प्रकरणी कारवाई करीत ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा केले.

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# ने.हि. महाविद्यालयात स्वा. सावरकर जयंती



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंती कार्यक्रम नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैयांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

याप्रसंगी संस्था सचिव अशोक भैया, कार्यकारी प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर डॉ. राजेंद्र डांगे, डॉ. धनराज खानोरकर, मेजर विनोद नरड, डॉ. अरविंद मुंगोले, डॉ. कुलजित शर्मा, डॉ. राजू आदे, डॉ. हर्षा कानफाडे, प्रा.रुपेश वाकोडीकर, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, प्रा. पराते सर, रुपेश चामलाटे, प्रज्ञा मेश्राम, शशिकांत माडे इत्यादींनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. धनराज खानोरकरांनी केले. यशस्वीतेसाठी प्रभारी डॉ. कुलजित शर्मा, डॉ. खानोरकर, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.



## संपादकीय...

# ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे गोंधळ

यावर्षी महाराष्ट्रातील एकूण ९ विभागीय मंडळांतील १५,५८,०२० विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यातील १५,४६,५७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर सीबीएसई आणि आयसीएसईचे आणखी काही लाख विद्यार्थीदेखील दहावी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांसाठी २० लाखांहून अधिक जागा राज्यातील विविध कनिष्ठ महाविद्यालयांत उपलब्ध आहेत. त्यानुसार राज्यातील सर्व पात्र कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवण्याचा शिक्षण संचालनालयाचा निर्णय स्तुत्यच म्हणावा लागेल, परंतु राज्यभरातील लाखो विद्यार्थी एकाचवेळी ऑनलाइन अर्ज भरणार असल्याने त्यासाठी संचालनालयाने भक्कम तयारी करणे आवश्यक होते. तशी तयारीच न केल्यामुळे मिशन ॲडमिशनच्या पहिल्याच दिवशी अकरावी प्रवेशाची ऑनलाईन प्रक्रिया कोलमडून पडली. विद्यार्थी-पालक मोठ्या उत्साहाने पहिल्या दिवशी ऑनलाईन नोंदणी, महाविद्यालयाचे पसंतीक्रम, शुल्क भरण्याचा प्रयत्न करत होते. परंतु सातत्याने प्रवेश प्रक्रियेची वेबसाईट ओव्हरलोडमुळे क्रॅश होत होती. त्यामुळे विद्यार्थी-पालक गोंधळून गेले.

सुरुवातीच्या टप्प्यात २१ मे ते २८ मे २०२५ असे ८ दिवस अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया होणार होती, परंतु अकरावी प्रवेशाच्या अधिकृत वेबसाईटमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने आता ऑनलाईन अर्ज नोंदणीसाठी नवे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. नव्या वेळापत्रकानुसार २६ मे ते ३ जून २०२५ पर्यंत अकरावी प्रवेशासाठी अर्ज नोंदणी करता येईल. विद्यार्थ्यांना फॉर्म भरण्यास आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम निवडण्यास पुरेसा वेळ देण्यात येईल, असे आश्वासन शिक्षण संचालनालयाने दिले आहे. या ४ दिवसांमध्ये वेबसाईटच्या तांत्रिक दुरुस्तीचे काम करण्यात येईल. महाविद्यालयीन शिक्षण म्हणजे दहावीपर्यंतच्या परिचित चौकटीबाहेर पाय ठेवून ग्लोबल जगात प्रवेश करण्याची सुरुवात असते. आयुष्याच्या या नव्या वळणावर सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना ठेच लागायला नको याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण महासंचालनालयाने आपल्या कामात थोडा अधिक व्यावसायिकपणा आणून विद्यार्थ्यांना तारीख पे तारीखा न देता रखडलेली अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे मार्गी लावावी, हीच अपेक्षा.

दहावी परीक्षेचे निकाल जाहीर होताच विद्यार्थी आणि पालकांना वेध लागतात ते अकरावीच्या प्रवेशाचे. दहावीची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊनही उत्तम शैक्षणिक दर्जा राखलेल्या महाविद्यालयांत प्रवेश मिळवणे हे काम कुठल्याही युद्धापेक्षाही कमी नसते. त्यामुळे सर्वच जिल्ह्यातील विद्यार्थी-पालक बाह्या सरसावून मिशन ॲडमिशनच्या रणांगणात उतरतात. पूर्वी दहावीचे निकाल जाहीर होताच विद्यार्थी आपल्या आवडीच्या महाविद्यालयात ऑफलाईन फॉर्म भरुन मेरिट लिस्टची वाट बघायचे. पहिली, दुसरी, तिसरी कट ऑफ लिस्ट जाहीर होईपर्यंत विद्यार्थी-पालक वाट बघायचे. टक्केवारीनुसार विद्यार्थ्यांचे नाव मेरिट लिस्टमध्ये येताच कुठल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा हे ठरवले जायचे. मात्र काळाच्या ओघात अकरावीचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने होऊ लागले आहेत.

यावर्षी एसएससी बोर्डानेही दहावीच्या परीक्षा वेळेत घेऊन नेहमीच्या तुलनेत आठवडाभर आधीच निकाल जाहीर केले. विद्यार्थी-पालकांसाठी हा मोठा आश्चर्याचा सुखद धक्काच होता. यावर्षी परीक्षेदरम्यान चोख व्यवस्था ठेवल्यामुळे पेपरफुटीचे प्रकारही घडले नाहीत किंवा चुकीच्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांना आयते गुण देण्याची वेळही शिक्षण मंडळावर आली नाही. हे अत्यंत कौतुकास्पद म्हणावे लागेल. परंतु अकरावीच्या ऑनलाईन प्रवेशातील तांत्रिक गोंधळामुळे या साऱ्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे. आता ही प्रक्रिया सुरळीत पार पडावी, हीच अपेक्षा...

# अंगावरून ट्रॅक्टर गेल्याने अल्पवयीन बालक ठार

ब्रह्मपुरी/का.प्र.

रेती घाटावर ट्रॅक्टर ट्रॉलीत रेती भरणाऱ्या मजुरांना नाश्ता देऊन परतणाऱ्या अल्पवयीन बालकाच्या अंगावरून भरधाव वेगाने ट्रॅक्टर गेल्याने अल्पवयीन बालक जागीच ठार झाल्याची घटना दिनांक २६ मे २०२५ सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास अऱ्हेर नवरगाव - चिखलधोकडा रेतीघाट येथे घडली.

फिर्यादी विकास तुळशीराम बट्टे राहणार अऱ्हेर नवरगाव यांनी दिलेल्या तक्रारीवरून, अऱ्हेर नवरगाव गावातील ट्रॅक्टर चालक नितेश रामचंद्र राऊत वय २४ याने फिर्यादीचा पुतण्या श्रीकांत रामलाल बट्टे वय १५ वर्षे यास रेती घाटावरील मजुरांना नाश्ता नेऊन देण्यासाठी आपल्या दुचाकी वरून अऱ्हेर नवरगाव चिकलधोकडा घाटावर नेले. घाटावरून परतत असताना, ट्रॅक्टर चालक नितेश रामचंद्र राऊत वय २४ याने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३४ सी जे ८१८० हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविले. त्यामुळे ट्रॅक्टर वर बसलेला अल्पवयीन मुलगा श्रीकांत रामलाल बट्टे हा उसळून ट्रॅक्टरच्या चाकाखाली आला. ट्रॅक्टर अंगावरून गेल्यामुळे अल्पवयीन बालक श्रीकांत रामलाल बट्टे याच्या गुप्तांगाला मार लागला. अल्पवयीन बालकास ब्रह्मपुरी येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

फिर्यादी विकास बट्टे यांनी दिलेल्या तक्रारीवरून, आरोपी नितेश रामचंद्र राऊत यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६ (१) मोटार वाहन कायदा १८४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# मान्सूनपूर्व तयारीसाठी नगर परिषदेची २० दिवसांची विशेष मोहिम

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगरपरिषद ब्रम्हपुरीच्या वतीने प्रशासक तथा मुख्याधिकारी श्रीमती अर्शिया जूही यांच्या मार्गदर्शनाखाली मान्सूनपूर्व तयारीसाठी २० दिवसांची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश आगामी पावसाळयात नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी शहरातील विविध उपाययोजना प्रभावीपणे राबविणे हा आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत शहरातील प्रमुख नाल्या स्वच्छ करणे, जलनिकासीच्या मार्गांची तपासणी व आवश्यक दुरुस्ती करणे तसेच साचलेल्या पाण्यामुळे उद्भवणाऱ्या आजारांपासून संरक्षण मिळवण्यासाठी औषध फवारणी व फॉगिंग यासारख्या आरोग्यविषयक उपाययोजना करण्यात येणार आहेत. मुख्याधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता मोहित ढोकणे व सॅनिटरी इन्स्पेक्टर नितीश रगडे हे अधिकारी विविध विभागांशी समन्वय साधून मोहिमेची अंमलबजावणी करीत आहेत. प्रत्येक वॉर्डमध्ये कामाचे नियोजन करून वेळेत कार्य पूर्ण करण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली असून, आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रसामग्री, मनुष्यबळ व वाहने सज्ज ठेवण्यात आली आहेत.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी देखील आपल्या परिसरात स्वच्छता राखावी, कचरा नाल्यांमध्ये टाकू नये, तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन मुख्याधिकारी अर्शिया जूही यांनी केले आहे. प्रशासन ही मोहीम यशस्वी करण्यासाठी पूर्णतः कटिबद्ध असून, नागरिकांच्या सहकार्याने ब्रम्हपुरी शहराचे मान्सूनपूर्व व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे पार पाडले जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

# कु. अमृता लांबे हिला पीएच.डी. पदवी प्रदान

ब्रम्हपुरी/का.प्र.



येथील सेवानिवृत्त प्रा. संजय लांबे यांची कन्या कु. अमृता लांबे हिने नुकतीच पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. ती सरदार वल्लभभाई राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, सुरत येथे ईलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग मध्ये शिक्षण घेत होती. तिने 'The Koopman operator approach to nonlinear control problems and its comparison with the Carleman embedding,' या विषयात शोधप्रबंध सादर करुन आचार्य पदवी प्राप्त केली. त्यासाठी सहा. प्रोफेसर डॉ. हिरेन जी. पटेल व प्रो.डॉ. एस. एन. शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले. तिने संशोधन कालावधीत ४ जरनल आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केले. आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शक व परिवाराला दिले आहे.

## विनोदिनी

एका वकिलाने आपली विहीर एका शिक्षकाला विकली. दोन दिवसांनी वकील शिक्षकाकडे आला आणि म्हणाला, 'सर, मी तुम्हाला विहीर विकली आहे, पण त्यातलं पाणी विकलेलं नाही. तुम्हाला पाण्याचा उपयोग करायचा असेल, तर त्यासाठी वेगळे पैसे द्यावे लागतील.'

शिक्षक हसत म्हणाले, ' अरे.. हो, मीही तुमच्याकडे येणारच होतो. मी तुम्हाला सांगणारच होतो की , तुमचं पाणी माझ्या विहिरीतून काढून टाका, नाहीतर उद्यापासून विहिरीत पाणी ठेवायचं भाडं द्यावं लागेल.'

हे ऐकून वकील घाबरला आणि म्हणाला, 'अहो मी तर मस्करी करत होतो!'

शिक्षक हसले आणि म्हणाले, ''बाळा, तुझ्यासारखे कितीतरी मुलं मी शिकवून वकील बनवले आहेत...!!!''

# अडयाळ टेकडी येथे जीवन शिक्षण शिबीर यशस्वीरित्या संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ०५ ते २० मे २०२५ या कालावधीत दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा जीवन शिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्र व इतर राज्यातून २५७ प्रशिक्षणार्थी मुलं मुली सहभागी झाले होते. विशेष मध्यप्रदेश मधील छिंदवाडा जिल्ह्यातील सुद्धा प्रशिक्षणार्थी सहभागी झालेत, हे प्रशिक्षण सुबोधदादा मार्गदर्शक व संचालक भु-वैकुंठ अडयाळ टेकडी, डॉ. नवलाजी मुळे अध्यक्ष अडयाळ टेकडी, सुश्री रेखाताई, गंगाताई, लक्ष्मीताई यांच्या मार्गदर्शनामध्ये सर्व प्रशिक्षकांनी १५ दिवसात सामूहिक ध्यान - सामू. प्रार्थना, भजन-भाषण, बौद्धिक, लाठी-




काठी, दांडपट्टा, कराटे, विविध आसन व स्वयं संरक्षणाचे धडे तसेच स्वावलंबन, स्वयंशिस्त, आरोग्यविषयी निसर्गोपचार, सेंद्रिय विषमुक्त शेती, गृहउद्योग, भाषण-संभाषण या सारख्या विविध विषयावर सर्व प्रशिक्षक यांनी अतिशय अल्पवधीमध्येच सर्व विद्यार्थ्यांना बहुआयामी व्यक्तीमत्व घडवण्यात मोलाचं कार्य केले.

या शिबिराचे समारोप दिनांक २० मे २०२५ ला सुबोधदादा यांच्या मार्गदर्शनात व डॉ. कुंभारे साहेब, यांच्या अध्यक्षतेखाली, वर्षा मोरे (मुंबई), बेबीताई काकडे (आंबोली चौरस्ता), देवराव कोंडेकर (ऊर्जा नगर), लालचंद नखाते (मोखारा), प्रांजली ताई कुबडे (नागपूर), दिलीप मेश्राम (गडचिरोली) आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

प्रसंगी विद्यार्थ्यांनी योगा-सूर्यनमस्कार, डंबेल्स, कराटे तसेच देशभक्तीपर कृती गीत, तुकाराम दादा यांचे उत्स्फूर्त गीत, लाठी - तलवार कवायत दानपट्टा अशा विविध कला-गुणांनी कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व उपस्थितांसमोर सादर केले. या समारोपीय कार्यक्रमास विशेष अतिथि आदरणीय काकडे आई, सुबोध दादा यांचे अतिशय सुंदर मौलिक मार्गदर्शन लाभले. प्रसंगी सुभाषजी बोरकर, गणेशजी पुंडलिक रोडे, सेलोटे, डॉ. लोकेश मुळे व त्यांची चमू यांनी व्यवस्थापनाची जबाबदारी चोखपणे पार पाडली. शेवटी राष्ट्रवंदना व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या शिबिरात प्रशिक्षक म्हणून अक्षय कुळे गुरुजी, गणेश लांजेवार सर ब्रम्हपुरी कराटे असोसिएशन, जोषेश बाढई गुरूजी, मधुकर टिकले प्रबोधनकार, विशाल वैद्य गुरुजी, विशाल पोहिनकर, आयुष आस्वले, पराग खोकले, चंद्रशेखर ढोरे, यश उरकुडे, साहिल बावणे, आरती ताई, पूजा ताई, शितल भाजीपाले, तेजस्विनी भाजीपाले, संचिता बोरकुटे इ. प्रशिक्षक व प्रशिक्षिका यांनी विद्यार्थ्यांना घडविण्यात मोलाचे कार्य केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निरंजन ठवरे सर नागपूर यांनी तर आभार प्रदर्शन सुश्री रेखाताई यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी साठी सर्व गुरुदेव प्रेमी यांनी अथांग परिश्रम घेतले.

**जल है तो कल है...**

## जगदिश मेहेर यांना महाराष्ट्राचा अभिमान पुरस्कार



ब्रम्हपुरी/का.प्र.

यहोवा यिरे संघटन, रेल यात्री एकता मजदुर संघ, राष्ट्रीय उद्योग भारत, पर्यावरण संवर्धन व विकास समिती महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य स्तरीय महाराष्ट्राचा अभिमान पुरस्काराने राज्यातील कृषी, शैक्षणिक, मेडिकल, सांस्कृतिक, क्रीडा, बँकिंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.

ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलानमाल येथे कार्यरत शिक्षक जगदीश जयवंत मेहेर यांना, शिक्षण क्षेत्रातील कार्यामुळे महाराष्ट्राचा अभिमान पुरस्कार मराठी सिने सृष्टीतील नामवंत अभिनेत्री रांगणा व राजे शिवराय या चित्रपटाची नायिका मयुरी नव्हाते हिच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार ग्लोबल मिस युनिव्हर्स रश्मी ढोलकीया, सुनील कुमार मांडवे दिल्ली, गिरिजा ऊईके सहाय्यक प्रकल्प अधिकारी शिक्षण विभाग नागपूर, शेषराव अजगरे लातूर, रमेश कुमार बोरकुटे चंद्रपूर, डी. के. आरिकर, दत्ता सर मुंबई आदी मान्यवरच्या उपस्थितीत सन्मानपुर्वक राज्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या यशाबद्दल सर्व मित्र मंडळी, सहकारी शिक्षक, ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## अक्षय कुळे 'द्रोण रत्न' क्रिडा पुरस्काराने सन्मानित

ब्रम्हपुरी/का.प्र.

उत्तराखंड, हरिद्वार येथे एक्सीडेंट वर्ल्ड रेकॉर्ड स्पोर्ट फेडरेशन ऑफ इंडिया द्वारे अवार्ड




सेरोमणी कार्यक्रम हरिद्वार स्पोर्ट स्टेडियमवर घेण्यात आले. त्यामध्ये श्री गुरूदेव आत्मानुसंधान भू वैकुंठ अड्याळ टेकडी ता. ब्रह्मपुरी येथील जीवन शिक्षण अध्यात्म गुरूकुल चे प्रशिक्षक व महाराष्ट्र मधून चंद्रपूर जिल्हातील ब्रम्हपुरी कराटे असोसिएशनचे विद्यार्थी अक्षय कुळे यांची द्रोण रत्न अवॉर्ड करिता निवड करण्यात आली.

'नुसते नको उच्च शिक्षण, हे तो गेले मागील युगी लपोन, आता व्हावा कष्टिक बलवान, सुपुत्र भारताचा।।' या युक्तीप्रमाणे अड्याळ टेकडीवर गुरूकुलात राहून, शालेय शिक्षण घेऊन सोबतच अक्षय कुळे गुरूजी यांनी त्यांच्या व्यायामाच्या क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावली आहे. हा गौरव फक्त अक्षय कुळे यांचा नसून हा त्याचे आई वडील, गावं अड्याळ जानी, भू वैकुंठ अड्याळ टेकडी, ब्रम्हपुरी तालुका व संपुर्ण गुरूदेव सेवा मंडळ चा सन्मान आणि गौरव आहे, असे वक्तव्य अड्याळ टेकडीचे संचालक सुबोध दादा यांनी केले आहे.

स्पोर्ट मध्ये मार्शल आर्ट आष्टेडू आखाडा मध्ये राष्ट्रीय स्तरावर तसेच कराटे मध्ये इंटरनॅशनल स्तरावर नेपाळ येथे सुवर्ण पदक, अशा अनेक श्रमदायिक प्रसंगावर मात करीत येलो बेल्ट पासून तर ब्लॅक बेल्ट पर्यंत अक्षय कुळे यांचा प्रवास काटेकोर झाला.

त्यांनी आपल्या यशाचे श्रेय पु. तुकाराम दादांची तपोभूमी अड्याळ टेकडी, मुख्य मार्गदर्शक व संचालक सुबोध दादा व गणेश लांजेवार सर यांना दिले आहे.

## पांडुरंग डेंगे यांच्या 'येनुली' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील खंडाळा येथिल कवी पांडुरंग डेंगे यांच्या 'येनुली' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा गुरुकुंज मोझरी येथील सुसंस्कार शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात रविदादा मानव, नामदेव गव्हाळे गुरुजी, मोहन वैद्य यांच्या हस्ते नुकतेच पार पडला.

पांडुरंग डेंगे यांचा 'माऊली' नंतर 'येनुली' हा दुसरा काव्यसंग्रह आहे. त्यांनी आजपर्यंत अनेक तिन अंकी




नाट्य लेखन व दिग्दर्शन केलेले असून पुण्या-मुंबई कडील दिग्गज कलाकाराच्या संचात नाटकांचे सादरीकरण केलेले आहे. पांडुरंग डेंगे झाडीपट्टीतील कवि, नाट्यलेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. ते मुक्ताक्षर जिवनविद्या कला केंद्रांचे अध्यक्ष असून त्यांनी संस्थेच्या माध्यमातुन परिसरात लोककला संम्मेलन, कला प्रदर्शनी व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. त्यांच्या 'येनुली' काव्यसंग्रहाचे परिसरात कौतुक केले जात आहे.

# सुरबोडी येथील नागरिकांनी लोकसहभागातून बांधला शेत तलाव

ब्रम्हपुरी/का.प्र.

जमिनीत पाणी मुरुन पाण्याची पातळी वाढावी म्हणून सुरबोडी येथील गावकऱ्यांनी एकत्र येत येथील शासकीय खुल्या शेतजमिनीवर लोकसहभागातून शेततळा तयार केल्याने गावकऱ्यांचे परीसरात कौतुक होत आहे.



ब्रह्मपुरी तालुक्यापासून जवळच असलेला सुरबोडी गावात लोकसहभागातून सार्वजनिक जागेवर तलाव बांधण्यात आला आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत सुरबोडी गावाची निवड झालेली असून या गावाची सूक्ष्म नियोजन प्रक्रिया पार पाडत असताना गावांमध्ये कोणते जलस्त्रोत उपलब्ध आहेत याचे सर्वे करण्यात आले. सर्व्हेक्षण करीत असताना अमित केराम कृषी पर्यवेक्षक यांनी गावांमध्ये असलेल्या विहिरी व इतर जलस्त्रोतांची पाहणी करून पाण्याची पातळी तपासली असता, सदर गावांमध्ये पाण्याची पातळी एप्रिल महिन्यामध्ये शून्य झालेली आढळून आली. यासोबतच गावामध्ये सर्वेक्षणातून तलाव, बोडी, बंधारे सारख्या प्रकारचे जलस्त्रोत अस्तित्वात नसल्याचे दिसून आले.

ग्रामपंचायत सरपंच राधिका बावनकुळे व इतर ग्रामपंचायत सदस्य, ग्राम कृषी विकास समिती सदस्य यांनी बैठक घेऊन गावामध्ये कायमस्वरूपी जलस्त्रोत निर्माण करण्यात यावे असा ठराव मांडला. यामध्ये प्रामुख्याने पाणी जमिनीत मुरवून पाणी पातळी वाढविणे हा हेतू पुढे ठेवून एक तलाव व नाला खोलीकरनाचे काम हाती घेणे आवश्यक असल्याचे ठरविण्यात आले. हे कामे करताना लोकसहभागातून कसे करता येईल याचे नियोजन करण्यात आले. त्याकरिता वरिष्ठ कार्यालयामार्फत परवानगी घेऊन ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या शासकीय जागेवर शेत तलाव खोदकाम करण्याचे काम हाती घेण्यात आले व लोकसहभागातून तलावाचे काम पूर्ण करण्यात आले.

यामध्ये गावातीलबचत गट सदस्य, महिला ग्रामसंघ, कृषी विकास समिती, गावातील नवयुवक मंडळ व गावातील शेतकरी व प्रतिष्ठित नागरिक यांचे खूप मोठे मोलाचे सहकार्य लाभले. सदर कामाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून हे कार्य करण्याकरिता दिगंबर कामडी उपसरपंच, तोंडरे ग्राम विकास अधिकारी, पुष्पा दुनेदार, हरिदास ठेंगरी, ग्राम पंचायत सदस्य, सुधीर मेश्राम पोलिस पाटील, श्याम बावनकुळे, प्रियंका देवढगले, स्वाती सहारे, पपीता कामडी, हिरालाल ठेंगरी माजी सरपंच, नवलाजी कामडी, तेजीना चौधरी कृषि सहायक, सुनंदा कामडी, संध्या बनकर, चेतन तुपट, दर्शन कामडी, सचिन सहारे, विशाल सहारे, लिलाधर ठाकरे, दिपाली कामडी, अविनाश कामडी, हिरालाल दोनाडकर, अनिकेत कामडी, विशाल डोलारे व सुरबोडी येथील संघर्ष नवयुवक मंडळ, ग्रामसंघ सदस्य, गावकरी बंधू भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## शेत तलावामुळे जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय

या तलावामुळे पाणी साठवून शेताला सिंचन म्हणून उपलब्ध करून देण्यात येईल व जनावरांना पिण्यासाठी पाण्याची सोय होईल. यापूर्वी गावात जनावराला पाणी पिण्यासाठी कोणतेही साधन नसल्यामुळे घरीच हातपंपाद्वारे किंवा विहिरीतून पाणी काढून पाणी पाजल्या जात असे परंतु हे सार्वजनिक तलाव झाल्यामुळे जनावराला पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

# चंद्रपूर जिल्हा कबड्डी संघाची निवड चाचणी

## ०१ व ०२ जूनला उपस्थित राहण्याचे आवाहन

ब्रम्हपुरी/का.प्र.

अमॅच्यूअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया एकेएफआय शी संलग्नित, कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ नागपूरच्या सूचना पत्रानुसार विदर्भ राज्य स्पर्धेत भाग घेण्यासाठी 'चंद्रपूर जिल्हा वरिष्ठ गट कबड्डी संघाच्या' निवडीकरीता (चंद्रपूर शहर वगळता) जिल्ह्यातील सर्व कबड्डी संघांना निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

'चंद्रपूर जिल्हा कबड्डी असोसिएशन नोंदणी क्रमांक ००००१२६/२०२५ चंद्रपूर' द्वारे आयोजित वरिष्ठ गट कबड्डी संघाच्या निवड चाचणीकरीता सर्व खेळाडूंनी सोबत आधार कार्ड आणि ३ पासपोर्ट साईज फोटो आणावे. सदर निवड चाचणी दि. १ जून व २ जून २०२५ रोज रविवार व सोमवरला सर्वोदय महाविद्यालय सिंदेवाही च्या पटांगणावर दुपारी १२ :००वाजता पासून घेण्यात येत आहे.

अधिक माहितीकरीता शुभम राहाटे मो. ८००७०८८९६६, ईश्वर कुथे मो. ९५५२९१०१३१, अनिल नाकाडे सर मो. ९४२३६४०५४८, राकेश शेंडे सर मुल मो. ७९७२७५१९२२ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन पत्रद्वारे केले आहे.

# सीबीएसई परिक्षेत भुवनेश्वरी नवखरे हिचे सुयश

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच पार पडलेल्या सीबीएससी बोर्डाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत विद्यानिकेतन स्कूल तसेच ज्युनिअर कॉलेज ब्रह्मपुरीची विद्यार्थीनी कु. भुनेश्वरी तारकेश्वर नवखरे हिने ९३.६६ टक्के मार्क्स मिळवून विशेष प्राविण्यसह स्कूलमधून प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.



तिने शारीरिक शिक्षण या विषयात शंभर पैकी १०० गुण तर इंग्रजी विषयांमध्ये ९८ गुण घेऊन विशेष प्राविण्य मिळविलेले आहे. यापूर्वी तिने इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले होते. नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत सुद्धा प्राविण्यासह यश मिळविले होते.

तिने आपल्या यशाचे श्रेय शाळेचे प्रिन्सिपल, सर्व शिक्षक वृंद तसेच पालकांना दिले आहे. तिच्या यशाबद्दल तिचे आजोबा नरेंद्र जिभकाटे सेवानिवृत्त प्राचार्य विद्यानगर ब्रह्मपुरी यांनी अभिनंदन करून भविष्यात असेच नेत्र दीपक यश संपादन करण्यासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# युवा शेतकऱ्याने पिकविली अद्ययावत केशर आंब्याची फळबाग



ब्रम्हपुरी/प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्रगतीशील आणि युवा शेतकऱ्यांचा प्रायोगिक शेती करण्याकडे कल वाढत असताना मात्र ब्रम्हपुरी तालुक्यामध्ये अनेक शेतकरी आजही पारंपरिक शेतीच करीत आहे. जिल्ह्यात फळबागेसाठी पोषण वातावरण नाही, तरीही ब्रम्हपुरी पासून ३ किमी अंतरावर असलेल्या दुधवाही येथील युवा शेतकरी प्रवीण मेश्राम या शेतकऱ्याने २०२१ मध्ये भाऊसाहेब फुंडकर योजनेमार्फत प्रामुख्याने केशर आंब्याची ३०० झाडे, मोसंबी, कागदी लिंबू, चिकू, फणस, तायवान पेरू सोबत विविध फळांची लागवड केली आहे. सध्या बाजारात आंब्याला चांगला दर असून, आंब्याच्या विक्रीतून ब्रम्हपुरी तसेच अन्य परिसरातील शेतकरी, आणि ग्राहक पाहण्याकरिता येऊन केशर आंबा प्रति किलो १५० रुपयांनी खरेदी करीत आहेत.

यापुढे सिंचन क्षेत्र वाढल्यास मोठ्या प्रमाणात शेतकरी फळबाग लागवट करू शकतात.फळबाग योजनेतून अनुदान भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये अनुदान मिळाले, शिवाय फळबागेकरीता लागनारे पाणी नियोजन करण्याकरिता ठिंबक सिंचना करिता सुद्धा शासनाकडून अनुदान प्राप्त केले आहे . युवा शेतकरी प्रविण मेश्राम यांनी शेतात फळबाग सोबत जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन आणि मत्स्य व्यवसाय पण सुरू केला आहे अशी माहिती फळबाग शेतकरी प्रविण मेश्राम यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना माहिती दिली.

# प्राध्यापक भरती आता लोकसेवा आयोगामार्फत ?

नागपूर/प्रतिनिधी

राज्यातील विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालयांत प्राध्यापक भरतीत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याच्या तक्रारी असल्याने यापुढे महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा स्वतंत्र निवड मंडळाकडून प्राध्यापक भरती करावी, अशी सूचना राज्यपालांनी केल्याची माहिती आहे. त्यासाठी उत्तरप्रदेश, बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही उच्च शिक्षण सेवा आयोग स्थापन करावे, अशी मागणी पुढे येत आहे.

जानेवारीत झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात राज्यपाल आणि कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांची निवड ‘पूर्णपणे गुणवत्तेवर’ करण्यासाठी पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याची गरज व्यक्त केली होती. त्यानुसार, राज्यपाल कार्यालयाने राज्य सरकार आणि सार्वजनिक विद्यापीठांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा वेगळ्या स्वतंत्र भरती मंडळामार्फत प्राध्यापक भरतीच्या शक्यतांचा शोध घेण्यास सांगितले. त्या अनुषंगाने, राज्यातील आणखी विद्यापीठांमधील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांच्या निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकतेसाठी गुणांकन पद्धती निश्चित केल्याचे, उच्च शिक्षण मंत्र्यांनी जाहीर केले.

या निवड पद्धतीमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण देण्यात येणार असले, तरी या निवड पद्धतीत गैरव्यवहार संपेलच, याची शक्यता कमी असल्याने अनुदानित महाविद्यालयातील सर्व पदे स्वतंत्र निवड मंडळाने करावी, अशा सूचना राज्यपालांनी केल्याचे समजते.

## बिहार, उत्तर प्रदेशात स्वतंत्र आयोग

**उत्तर प्रदेशात १९८२ पासून उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची भरती उत्तर प्रदेश उच्च शिक्षण सेवा आयोगाद्वारे केली जाते. उत्तर प्रदेश माध्यमिक शिक्षण सेवा निवड मंडळाद्वारेच माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भरती होते. आता, उच्च व माध्यमिक शाळांसाठी नव्याने उत्तर प्रदेश शिक्षण सेवा निवड आयोग तयार करण्यात आला आहे. बिहारमध्ये २०१७ मध्ये विद्यापीठ सेवा आयोगाची स्थापना स्थापन करण्यात आली आहे.**

# २५ वर्षीय युवकाचा हृदयविकाराने मृत्यू

ब्रह्मपुरी/का.प्र.

चक्रबोथली (कसर्ला) येथील सेवाभावी २५ वर्षीय युवक चक्रधर मुखरू दोनाडकर याचा मंगळवारी (दि. २७) रात्री १ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला.



चक्रधर हा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी व ग्रामपंचायत डाटा एन्ट्री ऑपरेटर ब्रह्मपुरी संघटनेचे अध्यक्ष म्हणून मोलाची जबाबदारी सांभाळत होता. सामाजिक कामांतून अनेकांना मदत केल्याने युवा कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण झाली होती. उमद्या तरुणाचा मृत्यू झाल्याने दोनाडकर कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. त्याच्या पश्चात आई, वडील, बहीण, भाऊ, काका, काकू, असा परिवार आहे.

❁❁❁❁❁❁❁

# ज्येष्ठांचा मोफत विमा काढलात का?

## वय ७० अथवा त्यापुढे असल्यास ५ लाखांचे संरक्षण

ब्रम्हपुरी/का.प्र.

केंद्र सरकार ज्येष्ठ नागरिकांसाठी पाच लाख रुपयांचा मोफत आरोग्य विमा देत आहे. त्यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट नाही. केवळ ७० आणि त्यापुढे वय असणाऱ्यांसाठी ही योजना लागू आहे. त्यासाठी कोठे जाण्याची गरज नाही, घसबसल्या ॲपवरून विमा संरक्षण घेता येते.

केंद्र सरकारने आयुष्मान वय वंदन योजना आणली आहे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा हा एक भाग आहे. या योजनेंतर्गत वैद्यकीय उपचारांसाठी पाच लाख रुपयांपर्यंतचे संरक्षण दिले जात आहे. नॅशनल हेल्थ ॲथोरिटीच्या माध्यमातून २३ सप्टेंबर २०१८ सालापासून आयुष्मान योजना राबविण्यात येत आहे.

सरकारी हॉस्पिटल आणि सरकारी योजनांचा लाभदेणाऱ्या मान्यताप्राप्त खासगी रुग्णालयांतही याचे उपचार दिले जातात. विशेष म्हणजे ही योजना कॅशलेस आहे; म्हणजे त्यासाठी पाच लाख रुपयांच्या मयदित झालेल्या खर्चाचे बिल भरण्याची आवश्यकता नाही. केंद्रीय आरोग्य विभागाने एक्स या समाज माध्यमावर या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. आयुष्मान ॲप आणि आयुष्मानच्या संकेतस्थळावरून आयुष्मान वय वंदन योजनेचे कार्ड लाभार्थ्यांना दिले जाते. योजनेची अधिक माहिती www. beneficiary. nha. gov. in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# अवैध दारू व्यवसायप्रकरणी १६६८ आरोपींना अटक

## चंद्रपूर जिल्ह्यात १५० पेक्षा अधिक दुकानांवर कारवाई

चंद्रपूर/प्रतिनिधी

मागील वर्षभरात जिल्ह्यात अवैध दारूची निर्मिती, वाहतूक व विक्री करणाऱ्या १ हजार ६६८ आरोपींना अटक करण्यात आली. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १५१ मद्यविक्री दुकानांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली. त्यातील १२९ अनुज्ञप्तीधारकांना एकूण ४७ लाखांचा दंड ठोठावण्यात आला. १५ दुकाने ५ ते १५ दिवसांपर्यंतच्या कालावधीकरिता निलंबित ठेवण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने २०२३-२४ या आर्थिक वर्षात ९६३ गुन्ह्यात ७७३ आरोपींना अटक केली होती. त्यांच्या ताब्यातून ४२ वाहनांसह ९८ लक्ष ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. त्या तुलनेत २०२४-२५ या आर्थिक वर्षात केलेल्या कारवाईत दुपटीने वाढ झाली आहे. या कालावधीत अवैध दारूची निर्मिती, विक्री, वाहतूक करणाऱ्यांविरोधात नोंदवलेल्या १८४० गुन्ह्यात १ हजार ६६८ आरोपींना अटक करण्यात आली.

त्यांच्या ताब्यातून १३५ वाहनांसह १ कोटी ९ लाख ११ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या तपासणीत १५१ अनुज्ञप्तींमध्ये नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आले. यातील १२९ प्रकरणांत प्रत्येकी २५ ते ५० हजार रुपयांपर्यंतचा दंड ठोठावण्यात आला.

हम दो, हमारा एक

... QUOTES ...

“One best book is equal to hundred good friends but one good friend is equal to a library.”

- Dr. APJ Abdul Kalam

# शॉर्ट सर्किटमुळे सलून दुकानाला आग



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील गजबजलेल्या खिस्तानंद चौकात पहाटे ३.३०मिनीटांनी सलुन दुकानाला आग लागली. हे दुकान चेतन प्रकाश वानखेडे यांच्यान मालकीचे असुन पुर्णपणे जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच आग विझविण्याचा प्रयत्न झाला. मात्र, तोपर्यंत आग वाढत जावुन दुकान खाक झाले. यामध्ये दुकानदाराचे अंदाजे ५ते ७ हजारापर्यंत नुकसान झाले आहे. आग कशी लागली याचा पोलीस तपास करीत आहे.

महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने आगीची नुकसान भरपाई शक्य तितक्या लवकर मिळावी या याठी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे विदर्भ पूर्व अध्यक्ष प्रा.डॉ. अशोक सालोटकर, संघटन मंत्री घनश्याम सुर्यवंशी, प्रदिप मेश्राम, विनायक शेंडे, धनंजय पगारे यांनी दुकानाला भेट देऊन नुकसान भरपाईची मागणी शासनस्तरावर केली आहे.

चा
रो
ळी

अक्कलदाढ आली आता
मास्तर संस्कार पुरे करा...
आम्ही आमचे बघुन घेऊ,
तुम्ही पगारासाठी संप करा...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

वाचाल तर वाचाल..

# सुधीर पंदिलवार यांना जीवे मारण्याची धमकी

## तालुका काँग्रेसच्या वतीने दोषीवर कारवाईची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांच्या ब्रम्हपूरी येथील जनसंपर्क कार्यालयाचे प्रमुख सुधीर पंदीलवार यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या भाजप कार्यकर्ता विलास विखार याचेवर कडक कारवाई करण्याची मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार व उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सुधीर पंदीलवार तु भालेश्वर रेती घाट किंवा कुठल्याही रेती घाटाच्या आसपास दिसल्यास ट्रक किंवा ट्रॅक्टरने उडविण्यात येईल अशी धमकी विलास विखारने दिली. विलास विखार यांनी मागील महीनाभरापुर्वी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजप पक्षात प्रवेश केला होता. सोमवार, दि. २६ मे रोजी अऱ्हेरनवरगाव येथील रेती घाटावर दुर्घटना घडली. त्यामध्ये एका बालकाचा मृत्यू झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर सुधीर पंदीलवार यांना मिळालेली धमकी हा गंभीर प्रकार असुन विलास विखार यांचेवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ही मागणी करतांना तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू नाकतोडे, माजी पं.स.सभापती नेताजी मेश्राम, माजी नगरसेवक जगदीश आमले, सुधाकर पोपटे, अनुसूचित जाती सेलचे जिल्हा सरचिटणीस डि.के.मेश्राम, पत्रकार राहुल भोयर, युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अमीत कन्नाके, अतुल राऊत, रवी पारधी, मुन्ना रामटेके, सुरज मेश्राम, प्रकाश खोब्रागडे, उपसरपंच संदीप बगमारे, सोमेश्वर उपासे, रवी पवार, जाकीर शेख, जितेंद्र ऊईके, लक्ष्मण जिभकाटे, लक्ष्मीकांत फुलबांधे, पितांबर फुलबांधे यांसह अन्य उपस्थित होते.

# पाऊस वैरी बनून कोसळतोय...

(पान क्र. १ वरून)

ओढावते. त्यामुळे शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. अशाही स्थितीत शेतकऱ्यांनी उन्हाळी धान पिक लावले, परंतु अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला. त्यामुळे 'पाऊस वैरी बनून कोसळतोय' असे भावोद्गार मोटावुटीला आलेल्या शेतकऱ्यांच्या मुखातून ऐकावयास मिळत आहेत.

**झाडे लावा, झाडे जगवा...**

# अवैध रेती तस्करी प्रकरणात...

(पान क्र. १ वरून)

त्याच रात्री ट्रॅक्टर चालक विशाल बावनकुळे व मालक पुष्पक पंचभाई यांनी ट्रॅक्टरचे वायर डायरेक्ट करीत ट्रॅक्टर तहसील कार्यालयातून पळवून नेले. याचवेळी जुन्या रेती तस्करीत पकडले गेलेले दोन ट्रॅक्टर सुद्धा रात्री पळविण्यात आले. त्यातील एक ट्रॅक्टर रात्रीच पळविणाऱ्यांनी पुन्हा तहसील कार्यालयात आणून ठेवला. तर दुसरा ट्रॅक्टर मालकाच्या दारात उभा राहताच फायनान्स कंपनीच्या लोकांनी जप्त केल्याचे कळते.

महसूल विभागाच्या मधूर आर्थिक हितसंबंधामुळेच तालुक्यात अवैध रेती तस्करी सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अवैध रेती तस्करीवर वेळीच आळा आणणे गरजेचे आहे, अन्यथा ब्रम्हपुरी तालुक्यात अवैध तस्करीतून संघटीत गुन्हेगारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आता केवळ ५०० रूपयांत होणार शेतजमिनीची वाटणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे आता केवळ पाचशे रुपयांमध्ये शेतीच्या वाटपाची नोंद होणार आहे.


महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यानुसार, संहिता शेतजमिनीचे वाटप करताना मोजणी करून वाटपाच्या दस्तास मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क द्यावे लागते. शेतजमिनीच्या वाटपपत्रास मुद्रांक शुल्काचा दर नाममात्र आहे. मात्र, नोंदणी शुल्काच्या बाबतीत सवलत नाही. मुद्रांक शुल्कापेक्षा नोंदणी शुल्क अधिक असल्याने अनेक शेतकरी दस्तांची नोंदणी करीत नाहीत. नोंदणी न केल्यामुळे भविष्यात शेतजमिनीबाबत वाद निर्माण झाल्यास त्याचा शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अशा दस्तांना नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना वाटपपत्राची नोंदणी सहजपणे करता येईल.

या निर्णयामुळे दरवर्षी ३५ ते ४० कोटी रुपये महसुलात घट येऊ शकते. मात्र, शेतीच्या वाटपपत्राची नोंदणी न केल्यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासातून सुटका करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.


**Miracle constructions & Developers**

**श्रीराम नगरी - डेव्हलपर्स**

**NATP प्लॉट्स उपलब्ध**



- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501

**डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.**



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337

**सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स**

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी





रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



**WANTED**

**Ekatmata Shikshan Sanstha Bramhapuri**

**Hindu Dnyan Mandir, Bramhapuri**

The appointment of qualified, experienced teachers is required for the primary and secondary departments.

| Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|
| Maths | B.Sc./M.Sc. (Math) B.Ed. | 01 |
| Science | B.Sc./M.Sc. B.Ed. | 01 |
| Computer Science | B.Sc.(Com.)/M.Sc.(Com.)/M.C.A, B.Ed. | 01 |
| Sport Teacher | U.G/P.G.,B.P.Ed./M.P.Ed | 01 |
| Art/ Craft | BFA, MFA | 01 |
| Music Teacher | BA, MA (Music) Sangeet Visharad | 01 |
| Pre. Primary Teacher | Montessori Trained/ BA / D.Ed Good Communication Skill in English | 01 |

Applicant can submit Application with Resume and Attested Photocopies of Certificate Physically At School Reception.
Last date:- 05th June 2025 Shortlisted Candidate Will Be Informed Called (Telephonically) For Interviews

Shortlisted candidates interview date and venue will be shared as per the schedule.

Secretary
Ekatmata shikshan
sanstha bramhapuri.

Head Mistress
Hindu Dnyan Mandir
Bramhapuri

Add: Near Dr.Ambedkar Chowk, Civil Line, Gujari Ward, Bramhapuri | 9422948783 / 9422322043


# 'पुस्तकाचे घर' तर्फे हर्षल विखारचा गौरव




ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरीतील प्रसिद्ध कवी, लेखक व पत्रकार डॉ. धनराज खानोरकर यांचे कुर्झा वार्डातील 'पुस्तकाचे घर'(ग्रंथसहवास )तर्फे १० वीच्या परिक्षेत ने.हि. हायस्कुलचा कुर्झा वार्डातील हर्षल मोरेश्वर विखार याला ९० टक्के गुण प्राप्त झाले. त्याचा मान्यवराच्या हस्ते यथोचित विशेष गौरव करण्यात आला.

हर्षलने कोणतीही शिकवणी न लावता मेहनतीने हे यश संपादन केले. 'पुस्तकाचे घर'चे संचालक डॉ. धनराज खानोरकर, नगरपालिका माजी बांधकाम सभापती विलास विखार,डॉ. बबन राऊत,सुखदेव खेत्रे,सागर घोरमोडे यावेळी उपस्थित होते.कु.हर्षल व त्याचे वडील मोरेश्वर विखार यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ,ग्रंथ व रोख रक्कम भेट देऊन त्यांना गौरविण्यात आले.


Lubi
बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

**गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी**

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar
CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404